# चारकोप मार्गावर अनधिकृत फेरीवाल्यांचा सुळसुळाट

■ प्रतिनिधी, मुंबई



कांदिवली पश्चिमेला चारकोप सेक्टर १ व ५ मध्ये तसेच सेक्टर ४ मधील मुख्य मार्गावर अनधिकृत व्यावसायिक आणि भाजी विक्रेत्यांचा अक्षरश: सुळसुळाट झाला आहे. अनधिकृत फ रीवाल्यांच्या हातगाड्यांनी पदपथासह अर्धा रस्ता गिळंकृत केला आहे.

परिणामी, वाहतुकीची मोठ्या प्रमाणात कोंडी होत आहे. तसेच पादचाऱ्यांना रस्त्यावरूनच वाहनांच्या कोंडीतून जीव मुठीत घेऊन मार्गक्रमण करावे लागत आहे. याकडे पालिकेचे अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याने वाहनचालकांसह पादचारी प्रचंड हैराण झाले आहेत.

कांदिवली पश्चिमेला म्हाडाची मोठी वसाहत आहे. सेक्टर १,२ व ५ मधील काडसिद्धेश्वर मार्ग तसेच सेक्टर ४ मधील वीर सावरकर या दोन्हीही मुख्य मार्गांवर, मालाड मालवणी येथील अनधिकृत फेरीवाल्यांनी बस्तान मांडले आहे. विशेष म्हणजे पदपथ आणि मार्गांवर भाजी, फळे, इतर वस्तू आणि कपड्यांचा बाजार मांडला आहे. रस्त्यावर दुहेरी हातगाड्या लागत असल्याने अर्धाधिक मुख्य मार्ग व्यापला आहे. यामुळे मार्गावर वाहतुकीची मोठी कोंडी होते. प्रवाशांना या कोंडीतूनच मार्ग काढावा लागतो. वरंवार तक्रारी केल्यावर पालिकेकडून थातूर-मातूर कारवाई करण्यात येते. मात्र, दुसऱ्या दिवसापासून पुन्हा तीच परिस्थिती होत असल्याने वाहनचालक आणि पादचारी मेटाकुटीला आले आहेत.

### बस थांबेही गायब

बस थांब्यांच्या आजूबाजूच्या जागेत देखील फेरीवाले व्यवसाय करत असल्याने बस थांबे देखील दिसतच नाहीत. प्रवाशांना बसची वाट पाहत रस्त्यावर उभे राहावे लागत आहे. प्रवासी रस्त्यावर उभे राहत असल्याने बसचालक रस्त्याच्या मधोमध बस उभी करतात, यामुळे मागील वाहनांची कोंडी होऊन लांबच लांब रांगा लागतात. यामुळे प्रवासी हैराण झाले आहेत.




■ **४ डिसेंबर हा नौदल दिन का?**

भारतीय नौदल हे जगातल्या सर्वोत्कृष्ट नौदलांपैकी एक आहे. गेल्या अनेक दशकातल्या आपल्या कामगिरीमुळेच शत्रूंच्या पोटात गोळा आणण्याची ताकद आपल्या नौदलाला मिळाली आहे. दरवर्षी भारत ४ डिसेंबर १९७१ ला मिळवलेल्या विजय साजरा करणे आणि शहिदांना श्रद्धांजली वाहण्यासाठी म्हणून नेव्ही दिवस म्हणून साजरा करतो. या दिवशी भारताने भारत-पाकिस्तान युद्धात ऑपरेशन ट्रायडंट यशस्वीरित्या पार पाडले होते. ४ डिसेंबर १९७१च्या रात्री भारतीय नौदलानं पाकिस्तानच्या कराची बंदरावर हल्ला केला, या हल्ल्यात आपल्या नौदलाने तुफानी हल्ला चढवत पाकिस्तानी नौदलाचं प्रचंड मोठं नुकसान केलं. त्यात पाकिस्तानी युद्धनौका, कराची बंदरातील तेलसाठा यासोबतच साधारण ५०० पाकिस्तानी नौसैनिकांना जखमी केलं. या कामगिरीत भारतीय नौदलाच्या आय. एन. एस. निपट, आय. एन. एस. निराघट आणि आय. एन. एस. वीर या मिसाईल वाहक नौकांनी मोठी भूमिका बजावली. या ऑपरेशनमध्ये पहिल्यांदाच अरबी समुद्रामध्ये अँटी शिप मिसाईलचा वापर करण्यात आला होता. त्यामुळे आपण ४ डिसेंबर हा नौदल दिन म्हणून साजरा करतो.

■ **ढासळलेल्या साम्राज्यातून उभा राहिलेला तंत्रशक्तीचा कणा**

जगाने कधीकाळी 'फेल्ड सिस्टिम' म्हणून हिणवलेला रशिया आजही जागतिक तंत्रशक्ती म्हणून ठाम उभा आहेही वस्तुस्थिती अनेकांना गोंधळात टाकते. सोव्हिएत संघाच्या विघटनानंतर आर्थिक कोसळलेपण, संसाधनांची कमतरता आणि आंतरराष्ट्रीय एकाकीपणा असूनही रशियाने विज्ञान, संरक्षण आणि अवकाश तंत्रज्ञानातील आपली परंपरा जपली. कारण त्यांची संशोधनसंस्कृती राजकीय बदलांवर अवलंबून नव्हती; ती संस्थात्मक, दीर्घकालीन आणि सातत्यपूर्ण होती. भारताकडे लोकसंख्या, बाजारपेठ आणि क्षमता असूनही तंत्रज्ञान आयातीवर अवलंबून राहण्याची सवय मोडायला वेळ लागतो. स्वदेशी संशोधनात सातत्य, धोरणात्मक गुंतवणूक आणि दीर्घकालीन दृष्टी या तीन गोष्टींची कमतरता आपल्याला जाणवते. रशियाची ताकद तेल, भू-राजकीय समीकरणे किंवा नेतृत्वापुरती मर्यादित नाहीती त्यांच्या शतकभराच्या वैज्ञानिक पायाभूत संस्कृतीत दडलेली आहे.

■ **इंडिगोची गडबड : वेगाने वाढणाऱ्या हवाई उद्योगाला धक्का.**

४ डिसेंबर २०२५ रोजी इंडिगोसमोर उभा राहिलेला गोंधळ हा केवळ एका कंपनीचा प्रश्न नाही; तो भारतातील हवाई वाहतुकीच्या वाढत्या ताणाचा आरसा आहे. ६०% बाजारहिस्सा असलेल्या कंपनीने क्रू टंचाईकडे दुर्लक्ष करून हिवाळी हंगामात उड्डाणे वाढवली, आणि च्या नवीन नियम ांमुळे ही कमतरता उघडी पडली. परिणामी शेकडो उड्डाणे रद्द, हजारो प्रवासी अडकले, आणि संपूर्ण व्यवस्थेचा साखळी परिणाम कोसळला. सुरक्षा नियमांवर तडजोड होऊ शकत नाहीहे स्पष्ट आहे. पण एवढ्या मोठ्या नेटवर्कला चालवताना नियोजन, भरती आणि तांत्रिक तयारी यांची जबाबदारीही तितकीच कठोर असायला हवी. प्रवाशांच्या वेळेचा आणि पैशाचा आदर राखणे ही विमान कंपन्यांची मूलभूत जबाबदारी आहे. ही घटना उद्योगाला एकच संदेश देते: वेग वाढवण्यापूर्वी इंजिन सक्षम असणे आवश्यक आहे.

■ **निष्ठा, दगाबाजी आणि सत्तेची नवी व्याख्या**

महाराष्ट्राच्या राजकारणात पहाटेच्या शपथविधीची घटना आजही एक प्रतीक बनून उभी आहेनिष्ठा आणि दगाबाजी यांच्यातील सीमारेषा किती पातळ असू शकते याचे उदाहरण म्हणून. त्या घटनेनंतर काही तासांतच सत्तेची समीकरणे उलटी झाली, आणि ज्यांनी पाऊल मागे घ्यावे लागले तेच आज राजकीयदृष्ट्या दुय्यम ठरत आहेत, अशी भावना अनेकांच्या मनात आहे. राजकारणात लाभार्थी कोण आणि किंमत कोण मोजतोहा प्रश्न नेहमीच गुंतागुंतीचा असतो. पण निष्ठा टिकवणाऱ्यांपेक्षा भूमिका बदलणाऱ्यांना अधिक महत्त्व मिळत असल्याची धारणा निर्माण झाली, तर ती लोकशाहीतील विश्वासाला धक्का देणारी ठरते.सत्ता ही क्षणभंगुर असते; पण विश्वास आणि सातत्य यांची किंमत दीर्घकालीन असते. महाराष्ट्राच्या राजकारणात हा धडा पुन्हा एकदा समोर आला आहे.

■ **वक्फ सुधारणा कायदा : पारदर्शकतेकडे एक कठोर वळण**

वक्फ सुधारणा कायदा २०२५ अंतर्गत 'उम्मीद' पोर्टलवर मालमत्ता नोंदणीची सहा महिन्यांची मुदत संपत आली आहे, आणि केवळ ३०% मालमत्ता अधिकृतरीत्या नोंदल्या गेल्याची वस्तुस्थिती अनेक प्रश्न निर्माण करते. उर्वरित ७०% मालमत्तांकडे कागदपत्रांचा अभाव असल्याचे सरकारी आकडे सांगतातहीच बाब या सुधारणा प्रक्रियेचे महत्त्व अधोरेखित करते. पारदर्शकता आणि कायदेशीर मालकी निश्चित करण्यासाठी नोंदणी अनिवार्य असताना काही धार्मिक आणि राजकीय गटांनी विरोधाची भाषा निवडली, तर न्यायालयाने मुदतवाढ नाकारत प्रक्रियेची गांभीर्याने दखल घेतली. कायद्याच्या चौकटीत राहूनच कोणत्याही समुदायाचे हक्क सुरक्षित राहू शकतातही मूलभूत बाब लक्षात घेणे आवश्यक आहे. भावनिक डरकाळ्यांपेक्षा दस्तऐवजीकरण आणि उत्तरदायित्व यांचीच खरी परीक्षा आता सुरू झाली आहे.

## मालाड येथे दोन दिवसीय साहित्य संमेलनाचे आयोजन

■ प्रतिनिधी, मुंबई

मराठी भाषा विभाग महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ - मुंबई आणि श्री समर्थ पुस्तकालय व लोकमान्य वाचनालय मालाड / कांदिवली (स्था. १९२०) यांच्या संयुक्त विद्यमाने अभिनव साहित्य संमेलनाचे भव्य आयोजन मालाड येथील कुरार गावामध्ये शनिवार, रविवारी सकाळी ८ ते सायंकाळी ७ या वेळेत करण्यात आले आहे .

या कार्यक्रमासाठी सर्व नागरिकांना विनामूल्य प्रवेश आहे. तरी सर्व साहित्य प्रेमी नागरिकांनी याचा जरूर लाभ घ्यावा. अशी विनंती संस्थेचे चिटणीस प्रवीण मालोडकर यांनी केलेली आहे.

कार्यक्रमाला डॉ.सदानंद मोरे,डॉक्टर प्रदीप ढवळ, आमदार सुनील प्रभू, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर राजा राम मोहन रॉय ट्रस्ट कोलकाताचे क्षेत्रीय अधिकारी आनंद वाघ, डॉक्टर मोनिका, जयू भाटकर ठक्कर सहाय्यक आयुक्त कुंदन वळवी, साधना कुदळे- ग्रंथपाल मुंबई महानगरपालिका. इत्यादी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## जोगेश्वरीत बांधकाम प्रकल्पात गुंतवणूक करण्यास प्रवृत्त करून फसवणूक

■ प्रतिनिधी, मुंबई

जोगेश्वरीतील एका बांधकाम प्रकल्पासाठी गुंतवणूक करण्यास प्रवृत्त करून एका खासगी बांधकाम कंपनीच्या जयकुमार गुप्ता व सुयश जयकुमार गुप्ता या पिता-पूत्र संचालकांनी २० जणांची सुमारे ३१ कोटीची फसवणूक केली आहे. अंधेरी पोलिसांनी अपहारासह फसवणुकीचा गुन्हा नोंदवून त्याचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग केला आहे.

यातील तक्रारदार फार्मा व्यावसायिक असून ते त्यांच्या कुटुंबीयांसोबत अंधेरी येथे राहतात. चार वर्षांपूर्वी त्यांची रणबीर रियल इस्टेट अॅण्ड डेव्हलपर्स या कंपनीचे संचालक असलेल्या जयकुमार आणि सुयश यांच्याशी ओळख झाली होती. त्यांनी त्यांच्या कंपनीकडून जोगेश्वरीतील मेघवाडी परिसरात एक बांधकाम प्रकल्प सुरू असल्याची माहिती दिली. तिथे तीन इमारतीचे बांधकाम होणार असून त्यापैकी एका इमारतीत फ्लॅटसह गाळेधारकांना गाळे देण्यात येणार आहे. उर्वरित दोन इमारतीमधील फ्लॅट व गाळे विक्रीसाठी असतील असे सांगून त्यांना त्यांच्या प्रकल्पात गुंतवणूक करण्याची विनंती केली.

या गुंतवणुकीवर त्यांना अठरा टक्के व्याज देण्याचेही आमिष दाखवले. त्यांचे प्रपोजल आवडल्याने त्यांच्यासह त्यांच्या कुटुंबियांनी त्यांच्या कंपनीत एप्रिल २०२१ ते मे २०२३ या कालावधीत ८ कोटी २६ लाखांची गुंतवणूक केली. ठरल्याप्रमाणे त्यांनी त्यांना मार्च २०२१ ते सप्टेंबर २०२४ या कालावधीत व्याजाची रक्कम दिली. मात्र नंतर त्यांनी व्याजाची रक्कम देणे बंद केले. याबाबत विचारणा केल्यावर ते दोघेही त्यांना टाळण्याचा प्रयत्न करत होते.

चौकशीदरम्यान त्यांना त्यांच्या परिचित व्यापाऱ्यासह इतर १८ जणांनी त्यांच्या बांधकाम प्रकल्पात ३१ कोटी २६ लाखांची गुंतवणूक केल्याची माहिती समजली. काही महिने परताव्याची रक्कम दिल्यानंतर त्यांना उर्वरित रक्कम देणे बंद केले होते. जयकुमार आणि सुयश यांच्याकडून फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी अंधेरी पोलिसांत तक्रार केली.

## मुंबई उपनगरात ग्राहक पंचायत संस्थेचे सभासद व्हा तक्रारींसाठी कायदेशीर मदत मिळणार

■ प्रतिनिधी, मुंबई



ग्राहक हक्कांसाठी समर्पित ग्राहक पंचायत महाराष्ट्र संस्थेने मुंबई उपनगरातील विक्रोळी येथे नवीन शाखा सुरू केली असून, या पावलामुळे सामान्य नागरिकांना दैनंदिन व्यवहारातील विविध समस्या सोडवण्यासाठी तात्काळ मार्गदर्शन आणि कायदेशीर मदत उपलब्ध होणार आहे. जास्त बिलिंग, खराब मालाची तक्रार किंवा बँकिंग विवादासारख्या मुद्द्यांवर उपनगरातील लाखो ग्राहकांना आता न्याय मिळवणे सोपे होईल, अशी अपेक्षा संस्थेच्या प्रणिता वैराळ,दिनेश बेरीशेट्टी,जयश्री दिदी खिलारी यांनी व्यक्त केली आहे.

ग्राहक चळवळीचे प्रणेते आणि संस्थेचे शिल्पकार ग्राहकतीर्थ बिंदुमाधव जोशी यांच्या प्रेरणेने उभी राहिलेल्या या संस्थेची मुंबई उपनगर शाखा ग्राहकांना केंद्रस्थानी ठेवून कार्यरत राहणार आहे. संस्थेचे अध्यक्ष डॉ. विजय लाड यांनी सांगितले, ''आमची संस्था सामान्य माणसाच्या छोट्या-मोठ्या तक्रारींना कायदेशीर आधार देऊन सोडवते. विक्रोळी शाखेमुळे उपनगरातील लाखो नागरिकांना फायदा होईल. आम्ही सरकारी, खासगी किंवा निमसरकारी क्षेत्रातील सर्व प्रकारच्या ग्राहक समस्या हाताळू.'' या शाखेच्या माध्यमातून ग्राहकांना त्यांचे हक्क कळवून त्यांना सक्षम करण्याचा उद्देश असल्याचे डॉ. लाड यांनी नमूद केले.

संस्था विविध प्रकारच्या तक्रारींसाठी मदत करते. यामध्ये वस्तूंच्या किंमतीत फरक असल्यास म्हणजे एमआरपीपेक्षा जास्त पैसे आकारले असल्यास परतावा मिळवणे; विजेच्या चुकीच्या बिलांची दुरुस्ती; विकत घेतलेल्या खराब मालासाठी दुकानदाराकडून रक्कम परत मिळवणे; एटीएममध्ये लाइट गेल्यामुळे अडकलेले पैसे बँकेकडून वसूल करणे; टीव्ही किंवा इतर उपकरणांच्या वॉरंटी कालावधीत खराब झाल्यास दुरुस्तीची हमी; गॅस रिफिलसाठी जादा पैसे किंवा रेग्युलेटर बदलासाठी अनुचित शुल्क वसूल केल्यास कारवाई; बँक हप्ता उशिरा झाल्यास मध्यस्थी; आणि आगाऊ रक्कम परत मिळवण्यासाठी कायदेशीर पाठपुरावा यांसारखे प्रमुख मुद्दे समाविष्ट आहेत. या सर्व तक्रारींना कायद्याच्या जोरावर तात्काळ हाताळले जाणार असल्याचे संस्थेच्या संघटकांनी स्पष्ट केले.

प्रणिता वैराळ यांनी सांगितले, ''ग्राहक पंचायत ही संस्था केवळ तक्रार ऐकते नाही, तर कायद्याच्या जोरावर न्याय मिळवते. आमची संस्था नोंदणीकृत (नोंदणी क्र. महा/४७४, एपा-१६४२०) असून, २०१६/०११३२९३ अंतर्गत राष्ट्रीय ग्राहक आयोगाशी संलग्न आहोत.'' संस्थेच्या या विस्तारामुळे ग्राहक जागरूकता वाढेल आणि अनुचित व्यवहारांविरुद्ध लढा अधिक मजबूत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

ग्राहक पंचायत महाराष्ट्र, मुंबई उपनगर शाखेचा पत्ता असा आहे ग्राहक मार्गदर्शन केंद्र, प्रणय असोसिएट्स बिल्डिंग नं. १५१, जवळ कन्नमवार नगर, विक्रोळी पूर्व, मुंबई - ४०००८३. संपर्कासाठी फोन क्रमांक प्रणिता वैराळ (९९२०९६३०६४), दिनेश बेरीशेट्टी (९९३०९७८४५८), जयश्री खिलारी (९८६९४७७४६७). संस्थेत सामील होण्याची इच्छा असल्यास वरील पत्त्यावर किंवा फोनवर संपर्क साधावा.३० नोव्हेंबर २०२५ रोजी संस्थेची मासिक सभा संपन्न झाली.या सभेत नवीन सदस्य ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे यांचे स्वागत जयश्री दिदी खिलारी यांच्या हस्ते करण्यात आले.सभेत अरुण रावले,संजय येवले आदि मान्यवर उपस्थित होते.

## के. के. मोदी वाणी चाळीचा पुनर्विकास अखेर म्हाडाच्या हाती

**मुंबई :** शिवडीतील के. के. मोदी वाणी चाळीचा पुनर्विकास तब्बल २८ वर्षे रखडला असून पुनर्विकास मार्गी लागावा यासाठी या चाळीतील रहिवासी कित्येक वर्षांपासून लढा देत होते. अखेर त्यांच्या लढ्याला यश आले. गृहनिर्माण विभागाने गुरूवारी एक शासन निर्णय प्रसिद्ध करून के. के. मोदी वाणी चाळ मालमत्तेच्या भूसंपादनाचा मार्ग मोकळा केला.

या शासन निर्णयानुसार आता म्हाडाचे मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळ मालमत्तेचे भूसंपादन करून पुनर्विकास मार्गी लावणार आहे. त्यामुळे या २०५ रहिवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. त्याच वेळी २८ वर्षे पुनर्विकास रखडविणाऱ्या विकासकाविरोधात कडक कारवाई करण्याचे निर्देशही गृहनिर्माण विभागाने दुरुस्ती मंडळाला दिले. अंदाजे ९५९२.९३ चौ.मीटर जागेवरील के. के. मोदी वाणी चाळीतील १३७ रहिवासी उपकरप्राप्त इमारतीत,, तर ६८ रहिवासी विनाउपकरप्राप्त इमारतीत राहत होते.

## नाना शंकरशेट मुंबई सेंट्रल टर्मिनस नामकरणाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

■ प्रतिनिधी, मुंबई

मुंबईच्या जडणघडणीत महत्त्वाचे योगदान देणारे नाना शंकरशेट यांचे नाव मुंबई सेंट्रल टर्मिनसला देण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविल्यानंतर राज्य सरकारकडून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. त्याचबरोबर म हाराष्ट्रातील तब्बल १५ खासदारांनी मुंबई सेंट्रल टर्मिनसचे नामकरण करण्यासाठी शिफारस केली.

मात्र गेली पाच वर्षे या प्रस्तावाकडे लक्ष देण्यास केंद्र सरकारला वेळ मिळालेला नाही. त्याच वेळी राज्य सरकारने पत्रव्यवहार करताच केंद्राने दोन रेल्वे स्थानकांचे नामकरण केल्याचे जाहीर केले. या प्रकारामुळे नाना शंकरशेट नामकरण संघर्ष समितीचे पदाधिकारी संतप्त झाले असून मुंबई महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीत त्याचे पडसाद उमटण्याची चिन्हे आहेत. राज्य सरकारने सीवूड आणि मोहापे या रेल्वे स्थानकांच्या नामकरणासाठी केंद्र सरकारला पत्रव्यवहार केला होता. त्यानुसार केंद्र सरकारने या दोन्ही स्थानकांचे नामकरण केल्याचे नुकतेच जाहीर केले. मात्र गेल्या अनेक वर्षांपासून म ुंबई सेंट्रल टर्मिनसला नाना शंकरशेट यांचे नाव देण्याची मागणी करण्यात येत आहे.

**GSL SECURITIES LIMITED**

CIN : L65990MH1994PLC077417

Regd. Office: 1/25 & 1/26, Tardeo Airconditioned Market Society, Tardeo Road, Mumbai - 400 034. Tel No:022-23516166 Email:gslsecuritiesltd@gmail.com Website:www.gslsecurities.com

**SPECIAL WINDOW FOR RE-LODGEMENT OF TRANSFER REQUEST OF PHYSICAL SHARES**

Pursuant to SEBI Circular No. SEBI/HO/MIRSD/MIRSD-PoD/P/CIR/2025/97 dated July 02, 2025, the Shareholders holding Equity Shares in Physical form are informed that a Special Window is open for a period of six months from July 07, 2025 to January 06, 2026 for re-lodgement of share transfer deeds. This facility is available for transfer deeds lodged prior to April 01, 2019, which were rejected/returned/not attended due to deficiency in the documents/process/or otherwise. The shares re-lodged for transfer will be issued only in dematerialized form. Eligible Shareholders who have missed the earlier deadline of March 31, 2021, may furnish the requisite documents to the Company's Registrar and Share Transfer Agents at Purva Sharegistry (I) Pvt. Ltd., 9 Shiv Shakti Industrial Estate, J. R. Boricha Marg, Near Lodha Excelus, Lower Parel East, Mumbai-400011 Tel.: 022-31998810 / 49614132 or the Company at gslsecuritiesltd@gmail.com.

**For GSL Securities Ltd.**
Sd/-
Place : Mumbai
Date : 05.12.2025
**S.K. Bagrodia**
Managing Director
DIN:00246168

## सेंट जॉर्ज रुग्णालयात सुरू होणार यकृत शस्त्रक्रिया

मुंबई : सेंट जॉर्ज रुग्णालयामध्ये येत्या १५ दिवसांमध्ये यकृत बाह्यरुग्ण विभाग सुरू करण्यात येणार असून रुग्णालयात शस्त्रक्रियाही करण्यात येणार आहेत. त्यामुळे राज्य सरकारच्या रुग्णालयांम ध्ये प्रथमच यकृतासंदर्भातील उपचार मिळण्याची स्वतंत्र सुविधा उपलब्ध होणार आहे. सेंट जॉर्ज रुग्णालयात सुरू करण्यात येणाऱ्या यकृत बाह्यरुग्ण विभागामध्ये म हिन्याला साधारणपणे १५० ते २०० रुग्ण उपचारासाठी येण्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. राज्य सरकारच्या सेंट जार्ज रुग्णालयामध्ये यकृत प्रत्यारोपण सुविधा उपलब्ध करण्यासाठी सरकारचे प्रयत्न सुरू आहेत.

**KLG CAPITAL SERVICES LIMITED**

**Regd. Office** : SKIL House, 209, Bank Street Cross Lane, Fort, Mumbai – 400 023. **CIN** : L67120MH1994PLC218169
**E-mail**: company.secretary@klgcapital.com, **Website**: www.klgcapital.com, **Tel. No.**: +91-22-66199000, **Fax No.**: +91-22-22696024

**Unaudited Financial Results for The Quarter and Period ended 30th September, 2025** (Rs in Lacs except otherwise stated)

| Sr. No. | Particulars | Standalone | | | | Consolidated | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter ended 30/09/2025 (Unaudited) | Quarter ended 30/06/2025 (Unaudited) | Quarter ended 30/09/2024 (Unaudited) | Year ended 31/03/2025 (Audited) | Quarter ended 30/09/2025 (Unaudited) | Quarter ended 30/06/2025 (Unaudited) | Quarter ended 30/09/2024 (Unaudited) | Year ended 31/03/2025 (Audited) |
| 1 | Total income from operations (net) | - | 17.84 | 19.74 | 73.03 | - | 17.84 | 19.74 | 73.03 |
| 2 | Net Profit / (Loss) for the Period ( Before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | (1,060.55) | (18.99) | 7.55 | (3.29) | (1,060.55) | (18.99) | 7.55 | (3.85) |
| 3 | Net Profit / (Loss) for the Period Before Tax, (After Exceptional and/or Extraordinary items) | (1,060.55) | (18.99) | 7.55 | (3.29) | (1,060.55) | (18.99) | 7.55 | (3.85) |
| 4 | Net Profit / (Loss) for the Period After Tax, (After Exceptional and/or Extraordinary items) | (1,060.55) | (18.99) | 5.21 | (3.29) | (1,060.55) | (18.99) | 5.21 | (3.85) |
| 5 | Total Comprehensive Income for the period (Compersing Profit/(Loss) for the Period (After Tax) and Other Comprehensive Income (After Tax) | NA | NA | NA | NA | NA | NA | NA | NA |
| 6 | Equity Share Capital | 320.24 | 320.24 | 320.24 | 320.24 | 320.24 | 320.24 | 320.24 | 320.24 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve as shown in the Balance Sheet of previous year). | - | - | - | 428.63 | - | - | - | 420.81 |
| 8 | Earnings Per Share (of Rs. 10/- each) for Continuing and discontinued operations | | | | | | | | |
| | Basic : | (33.12) | (0.59) | 0.16 | (0.10) | (33.12) | (0.59) | 0.16 | (0.12) |
| | Diluted: | (33.12) | (0.59) | 0.16 | (0.10) | (33.12) | (0.59) | 0.16 | (0.12) |

NOTES :
The above is an extract of the detailed format of Annual / Quarterly Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Annual Financial Results are available on the Company's website at www.klgcapital.com and the website of Stock Exchanges where the Equity Shares of the Company are listed i.e.,BSE Limited at www.bseindia.com.

By order of the Board of Directors
For KLG Capital Services Limited
Sd/-
Place: Mumbai
Date : December 04, 2025
CHINTAN RAJESH CHHEDA
Director - DIN : 08098371

**JPT SECURITIES LIMITED**

**Regd. Office** : SKIL House, 209, Bank Street Cross Lane, Fort, Mumbai – 400 023 **CIN** : L67120MH1994PLC204636
**E-mail**: company.secretary@jptsecurities.com, **Website**: www.jptsecurities.com, **Tel. No.**: +91-22-66199000, **Fax No.**: +91-22-22696024

**Unaudited Financial Results for The Quarter and Period ended 30th September, 2025** (Rs in Lacs except otherwise stated)

| Sr. No. | Particulars | Standalone | | | | Consolidated | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter ended 30/09/2025 (Unaudited) | Quarter ended 30/06/2025 (Unaudited) | Quarter ended 30/09/2024 (Unaudited) | Year ended 31/03/2025 (Audited) | Quarter ended 30/09/2025 (Unaudited) | Quarter ended 30/06/2025 (Unaudited) | Quarter ended 30/09/2024 (Unaudited) | Year ended 31/03/2025 (Audited) |
| 1 | Total income from operations (net) | - | 10.47 | 10.59 | 42.01 | - | 10.47 | 10.59 | 42.01 |
| 2 | Net Profit / (Loss) for the Period (Before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | (656.06) | (3.36) | 2.69 | (19.95) | (656.06) | (3.36) | 2.69 | (19.51) |
| 3 | Net Profit / (Loss) for the Period Before Tax, (After Exceptional and/or Extraordinary items) | (656.06) | (3.36) | 2.69 | (19.95) | (656.06) | (3.36) | 2.69 | (19.51) |
| 4 | Net Profit / (Loss) for the Period After Tax, (After Exceptional and/or Extraordinary items) | (656.07) | (3.38) | 2.05 | (20.00) | (656.11) | (3.40) | 2.02 | (20.00) |
| 5 | Total Comprehensive Income for the period (Compersing Profit/(Loss) for the Period (After Tax) and Other Comprehensive Income (After Tax) | NA | NA | NA | NA | NA | NA | NA | NA |
| 6 | Equity Share Capital | 300.60 | 300.60 | 300.60 | 300.60 | 300.60 | 300.60 | 300.60 | 300.60 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve as shown in the Balance Sheet of previous year). | - | - | - | 50.73 | - | - | - | 50.73 |
| 8 | Earnings Per Share (of Rs. 10/- each) for Continuing and discontinued operations | | | | | | | | |
| | Basic : | (21.83) | (0.11) | 0.07 | (0.67) | (21.83) | (0.11) | 0.07 | (0.67) |
| | Diluted: | (21.83) | (0.11) | 0.07 | (0.67) | (21.83) | (0.11) | 0.07 | (0.67) |

NOTES :
The above is an extract of the detailed format of Annual / Quarterly Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Annual Financial Results are available on the Company's website at www.jptsecurities.com and the website of Stock Exchanges where the Equity Shares of the Company are listed i.e.,BSE Limited at www.bseindia.com.

By order of the Board of Directors
For JPT Securities Limited
Sd/-
Place: Mumbai
Date : December 04, 2025
CHINTAN RAJESH CHHEDA
Whole- Time Director
DIN : 08098371